# २४ रोजनिशी

BHB6HK

रोजनिशी लिहिल्याने माणसाला जीवनाकडे बघण्याची नवी दृष्टी मिळते. दिवसभरातील सर्व घडामोडींची नोंद आपण रोजनिशीमध्ये रोज रात्री झोपण्यापूर्वी करत असतो. रोजनिशी कशी लिहितात हे विद्यार्थ्यांना समजावे, त्यांनी रोजनिशी लिहावी हे या पाठामागचे प्रयोजन आहे. वैभवच्या रोजनिशीचे चौथे पान रिकामे आहे.

शाळेतून तुम्ही घरी आला आहात. शाळेत खूप धमाल झाली आहे. तुम्हांला हे कोणालातरी सांगायचे आहे; पण घरी कोणीच नाही. अशा वेळी तुम्ही काय कराल ?

वैभवला एक नवीन छंद जडला आहे. तो नियमितपणे रोजनिशी लिहितो. त्याने लिहिलेली तीन दिवसांची रोजनिशी वाचूया.



**१५ नोव्हेंबर**

शाळेजवळच्या बस स्टॉपवरून संध्याकाळी साडे पाच वाजता बसमध्ये चढलो. एक आजोबा आणि त्यांची लहानगी नात यांच्याजवळ मला जागा मिळाली. कंडक्टरने माझा पास बघितला व आजोबांकडे तिकिटाचे पैसे मागू लागला. आजोबांनी खिशात हात घातला; पण त्यांच्या हाताला पैशाचे पाकीट लागेना. कंडक्टर म्हणाला, "अहो आजोबा! लवकर पैसे काढा." आजोबा म्हणाले, ''बापरे! पैशांचे पाकीट बसस्टॉपवर कुणीतरी मारले वाटते. घरून निघताना मी ते खिशात टाकले होते." कंडक्टर म्हणाला, "त्याला मी काय करू ? तुम्हांला नीट सांभाळता येत नाही. चला पुढल्या स्टॉपवर उतरून जा." चिडलेल्या आवाजातील संवाद ऐकून नात जोराने रडू लागली. आजोबाही कावरेबावरे झाले. मी दप्तराच्या खिशात हात घालून माझे खाऊचे पैसे काढले, त्या पैशांतून आजोबांचे व त्या मुलीचे तिकीट काढले. माझ्याजवळचा बिस्किटाचा पुडा छोटीला दिला. तिने डोळे पुसले. ती खुदकन हसली.



**१६ नोव्हेंबर**

शाळेच्या सहलीबरोबर 'नागझरी' ला गेलो होतो. रस्त्यात एक शिवार लागले. शिवारातील कणसे, ओंब्या पाहिल्या. तेथे हरभऱ्याचे डहाळे लागले होते. ते पाहून आमच्या तोंडाला पाणी सुटले. शेतात घुसलो आणि डहाळे उपटू लागलो. तेवढ्यात तिकडून कोणीतरी जोरात ओरडले.

शेतकऱ्याच्या परवानगीशिवाय आम्ही डहाळे उपटले, हे पाहून गुरुजी आमच्यावर खूप रागावले. आम्ही त्या शेतकऱ्याची माफी मागितली. खरंच, आमचं चुकलंच होतं. शिवार फिरून झाल्यावर परतताना मात्र त्या शेतकऱ्याने आम्हां सर्व मुलांना हरभऱ्याचे थोडेसे डहाळेही दिले.

**१७ नोव्हेंबर**

आज वर्गातील आठ-दहा मुलांना मुख्याध्यापकांनी विशेष कामासाठी बोलावले होते. आम्ही खाली रांगेत जाताना राजूने मला जोरात ढकलले. त्याला सर्वांत पुढे उभे राहायचे होते आणि मलासुद्धा. आमच्या दोघांमध्ये वादावादी सुरू झाली. तेवढ्यात आमचे सर आले. त्यांनी दोघांनाही वर्गात बोलावले.

वर्गात गेल्यावर आम्हां दोघांनाही सर खूप रागावले अन् म्हणाले, ''रांगेत सर्वांत पुढे राहण्यासाठी भांडता? त्यापेक्षा सगळ्या कामांत सर्वांत पुढे कसे राहाल याकडे लक्ष द्या.'' आम्ही दोघेही खाली मान घालून वर्गात बसलो. क्षुल्लक भांडणामुळेच मुख्याध्यापकांकडून मिळणारी विशेष कामाची आमची संधी हुकली होती, म्हणून मला सारखे वाईट वाटत राहिले.

**१८ नोव्हेंबर**

आज माझा वाढदिवस होता. खूप मजा आली. ........

## स्वाध्याय



**प्र. १. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) वैभवच्या रोजनिशीतील कोणते पान तुम्हांला सर्वांत जास्त आवडले ते लिहा.

(आ) रोजनिशी का लिहावी? तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. २. का ते लिहा.**

(१) आजोबांची नात जोराने रडू लागली.

(२) वैभवने आजोबा व त्यांच्या नातीचे तिकीट काढले.

(३) आजोबांची नात खुदकन हसली.

(४) मुलांनी शेतकऱ्यांची माफी मागितली.

(५) शेतकऱ्याने मुलांना थोडेसे डहाळे दिले.

(६) वैभवची विशेष काम करण्याची संधी हुकली.

**प्र. ३. तुम्ही महिन्यातील पहिल्या आठवड्याची रोजनिशी लिहा व ती दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वाचा. तुम्हांला काही आठवते का ते सांगा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.**

(१) कावरेबावरे होणे.
(२) तोंडाला पाणी सुटणे.
(३) वादावादी होणे.
(४) खाली मान घालणे.

**(आ) हरभऱ्याचा डहाळा तसे खालील गोष्टींसाठी काय म्हणतात ते लिहा.**

(१) गहू
(२) लसूण
(३) ज्वारी
(४) चिंच
(५) ऊस

**प्र. ४. हरभऱ्याचे डहाळे पाहून मुलांच्या तोंडाला पाणी सुटले. शिवार वा शेतातून जाताना कोणत्या वस्तू पाहिल्यावर तुमच्या तोंडाला पाणी सुटते ? त्या वस्तूंची यादी करा.**

**प्र. ५. वैभवची शाळा सुटल्यापासून तो घरी पोहोचेपर्यंत कोणकोणत्या घटना घडल्या ते क्रमवार लिहा.**
**उदा., शाळा सुटल्यावर बसस्टॉपवर पोहोचणे.**

**प्र. ६. तुमचे मुख्याध्यापक किंवा वर्गशिक्षक कोणकोणती विशेष कामे तुम्हांला सांगतात? त्या कामांची यादी करा.**

**प्र. ७. वर्गात तुमचे काही चुकले असेल आणि ते तुम्हांला पटले असेल, त्यावेळी तुमच्या मनात कोणते विचार येतात? तुमचा अनुभव सात-आठ ओळींत लिहा.**

**प्र. ८. खालील गोष्टींसाठी केल्या जाणाऱ्या क्रियांना काय म्हणतात ते लिहा.**

उदा., डहाळे - उपटणे

(१) ज्वारीचे कणीस
(२) भेंडी, मिरच्या
(३) रताळी, बटाटे
(४) बाजरीचे कणीस
(५) ऊस

**प्र. ९. खालील घटना घडल्या हे पाठातील कोणत्या वाक्यांवरून समजते ?**

(१) वैभवची शाळा पाच वाजता सुटते.
(२) आजोबांची नात खूप घाबरली.
(३) सहलीला गेलेल्या मुलांना हरभरा आवडतो.
(४) सहलीतील मुलांना त्यांची चूक समजली.